# जिल्हा उद्योग केंद्र, रत्नागिरी

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (MIDC) इमारत , जे के फाईल्स ,बँक ऑफ इंडिया शेजारी, रत्नागिरी

# १०० दिवसांचा कृती आराखड्याचे नियोजन

# संक्षिप्त माहिती व कार्य

महाराष्ट्र शासनाच्या उद्योग विभागांतर्गत उद्योग संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे अधिपत्याखाली रत्नागिरी जिल्ह्याचे मुख्यालयी जिल्हा उद्योग केंद्र, रत्नागिरी या कार्यालयाची स्थापना सन १९७८ मध्ये झाली आहे.

जिल्ह्यात नवीन उद्योग स्थापित व्हावेत व प्रस्तावित उद्योग सुस्थितीत चालू रहावेत व परिणामी रोजगाराच्या संधी अधिकाधिक उपलब्ध व्हाव्यात या दृष्टीने जिल्हा उद्योग केंद्र कार्य करते.

# जिल्हा उद्योग केंद्र राबवत असलेल्या योजना/धोरणे

## योजना

- प्रधानमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम
- मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम
- बीज भांडवल योजना व जिल्हा उद्योग केंद्र कर्ज योजना
- औद्योगिक पायाभूत सुविधा योजना
- जिल्हा उद्योग मित्र सभा, जिल्हा उद्योग पुरस्कार इ
- औद्योगिक समूह विकास योजना

## धोरणे

- सामुहिक प्रोत्साहन योजना धोरण-२०१३ व २०१९
- विशेष महिला धोरण-२०१७
- बाबासाहेब आंबेडकर अनु.जा. व अनु.ज. योजना धोरण
- आयटी/आयटीईएस धोरण-२०२४
- महाराष्ट्र औद्योगिक धोरण - २०१९
- महाराष्ट्र इलेट्रॉनिक्स धोरण-२०१६
- महाराष्ट्र इलेक्ट्रीक व्हेईकल धोरण-२०१८ व २०२१
- महाराष्ट्र लॉजिस्टीक धोरण-२०२४


# निश्चित करण्यात आलेला सात कलमी कार्यक्रम

## १ संकेतस्थळ

- उद्योग संचालनालय, मुंबई या मुख्यालयाचे www.di.maharashtra.gov.in हे अद्ययावत संकेतस्थळ नागरीकांसाठी सुलभ व सहज माहिती मिळण्यासाठी उपलब्ध केले आहे.
- सदर संकेतस्थळावर या कार्यालयाची माहिती अद्ययावत करण्यात आली असून आवश्यक शासन निर्णय, आदेश, तसेच माहिती वाचकांसाठी उपलब्ध करुन देण्यात आली आहे.
- तसेच उद्योजकांना सर्व परवाने एकाच ठिकाणी उपलब्ध व्हावेत यासाठी मैत्री कक्ष मुंबई येथे सुरू करण्यात आलेला आहे. www.maitri.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उद्योग विभागाची धोरणे व शासन निर्णय उपलब्ध आहेत.


# निश्चित करण्यात आलेला सात कलमी कार्यक्रम

## संकेतस्थळ




उद्योग संचालनालयचे संकेतस्थळ - www.di.maharashtra.gov.in

मैत्री कक्षाची स्थापना व संकेतस्थळ- www.maitri.maharashtra.gov.in



## १. (उ) आरटीएस अंतर्गत खालील ऑनलाइन सेवा दिल्या जातात.

| अ.क्र. | अधिसूचित सेवा | कालावधी |
|---|---|---|
| १. | मुद्रांक शुल्क प्रमाणपत्र निर्गमित करणे | ७ दिवस |
| २. | अनुदान दावे मंजूर करणे | १५ दिवस |
| ३. | पात्रता प्रमाणपत्र मंजूर करणे | ३० दिवस |
| ४. | खाजगी माहिती तंत्रज्ञान घटकांना नोंदणी इरादापत्र | ७ दिवस |
| ५. | खाजगी माहिती तंत्रज्ञान उद्यानांना नोंदणी इरादापत्र | ३० दिवस |
| ६. | खाजगी जैव तंत्रज्ञान घटकांना नोंदणी इरादापत्र | ७ दिवस |

## १. (इ) आरटीआय अंतर्गत माहितीचे स्वयंप्रकटीकरण

- कलम ४ अंतर्गत कार्यालयाबाबत १७ मुद्यांच्या माहितीचे स्वयंप्रकटीकरण करण्यात आले असून सदर माहिती कार्यालयात अभ्यागतांसाठी नोटिस बोर्डवर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

# २. सुकर जीवनमान

| अ. क्र. | कार्यालयाचे नाव | ठरविण्यात आलेल्या दोन सुविधा | कार्यवाही |
|---|---|---|---|
| १ | जिल्हा उद्योग केंद्र, रत्नागिरी | स्वयं रोजगारासाठी च्या व इतर योजनांची माहिती सांगणे | श्री राहुल कोकजे यांची या कामासाठी नेमणूक केली आहे |
| २. | | CMEGP ,PMEGP योजनेचे अर्ज भरून देणे | CMEGP, PMEGP योजनेचे अर्ज भरून देण्यासाठी कु पूर्णागी वायंगणकर यांची नेमणूक केली आहे |
| ३ | | जिल्हा वार्षिक कर्ज योजनेंचे अर्ज भरून घेणे. | जिल्हा वार्षिक कर्ज योजनेची माहिती सांगणे व अर्ज भरून देणेसाठी श्री संदीप ताडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. |
| ४ | | Export Policy व ODOP यांची माहिती | Export Policy व ODOP यांची माहिती सांगणेसाठी श्री संकेत कदम, उद्योग अधिकारी यांची नेमणूक करण्यात आली आहे. |

# नागरीसेवा सुलभीकरणापूर्वीची व नंतरची स्थिती

| अ क्र | सुलभीकरणपूर्वीची स्थिती | सुलभीकरणा नंतरचे बदल |
|---|---|---|
| १. | माहिती मिळण्याबाबत विहित मार्ग उपलब्ध नसल्यामुळे नागरिकांना माहिती मिळवण्यात अडचण येत होती. | स्वंतत्र योजना व धोरणनिहाय अधिकारी व कर्मचारी यांची नेमणूक केल्यामुळे नागरिकांना तात्काळ माहिती देण्यात येऊन नागरी सेवांचे सुलभीकरणात बदल घडून आला. |
| २ | योजनांचे अर्ज भरणे ही नागरिकांची जबाबदारी असल्यामुळे सदर अर्ज हे खाजगी सेवा केन्द्रा मार्फत भरले जात. त्यामुळे लाभार्थ्यांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत होता. | कार्यालयात अर्ज भरून दिल्यामुळे मध्यास्थाताचे उच्चाटन होऊन नागरिकांचे वेळ व पैसा यामध्ये बचत झाली |

# ३ स्वच्छता


**(अ) कार्यालयातील अभिलेखांची निंदणीकरण व वर्गीकरण झाले आहे.**





**(उ) कार्यालयातील जुन्या वाहनांचे निर्लेखन झाले असून सध्या कार्यालयाकडे कायम स्वरूपी वाहन उपलब्ध नाही.**

## ४ (अ) (आ) आपले सरकार व पी. जी. पोर्टलवरील तक्रारींचे निवारण

- आपले सरकार पोर्टल आणि पी.जी. पोर्टलवरील दि. 01.04.2025 पर्यंतच्या सर्व तक्रारी सोडवण्यात आल्या आहेत.




## ४ (इ) जनतेच्या तक्रारीचे निवारण

- लोकशाही दिनामध्ये या कार्यालया संदर्भात १ तक्रार प्राप्त झाली होती. त्यावर योग्य ती कार्यवाही केली आहे.

# ४ (इ) जनतेच्या तक्रारीचे निवारण




- नागरीकांना तक्रार करण्यासाठी कार्यालयाच्या दर्शनी भागात तक्रार पेटी उपलब्ध करून देण्यात आली आहे.
- नागरीकांकडून कार्यालयास प्राप्त झालेल्या सर्व तक्रारीचे त्वरेने निराकारण करण्यास प्राधान्य देण्यात **येते**.
- सर्व प्राप्त तक्रारीचे निपटारा होण्याच्या अनुषंगाने दरमहा पहिल्या सोमवारी कार्यालयीन बैठकीचे आयोजन करण्यात **येते**.
- प्रलंबित तक्रारींसाठी महिन्यातील पहिला सोमवार राखून ठेवण्यात आला आहे. सदर दिवशी कार्यालयातील सर्व अधिकारी/कर्मचारी उपस्थित राहतील, याची दक्षता घेण्यात **येते**.
- अभ्यागतांना भेटण्यासाठीची वेळ कार्यालय प्रमुखांनी निश्चित केली आहे.



# ५ कार्यालयातील सोयी व सुविधा



- कार्यालयांमधील कर्मचारी वर्ग तसेच येणारे अर्जदार, लाभार्थी वर्ग तसेच अभ्यांगत यांचेकरीता पिण्याच्या पाण्याची योग्य व कायमस्वरुपी व्यवस्था करण्यात आली आहे.
- कार्यालयामध्ये येणाऱ्या अभ्यागातांना बसण्यासाठी आसन व्यवस्था करण्यात आली आहे.
- प्रसाधनगृह स्वच्छ ठेवण्याच्या अनुषंगाने वेळोवेळी लक्ष दिले जाते.
- कार्यालयात काम करणाऱ्या कर्मचारी नावे दर्शनीस्थळी लावली आहेत.












# ५(उ) कार्यालयाचे सौंदर्यीकरण

**विविध योजनांचे माहितीपर फलक व अधिसूचित सेवांचा तपशील दर्शनी भागात लावण्यात आलेले आहेत.**





# ६.(अ)(आ) केंद्र आणि राज्य शासनाच्या महत्वाच्या कार्यक्रम/ प्रकल्पांना भेटी व क्षेत्रीय भेटी

- CMEGP योजनेअंतर्गत लाभ घेतलेल्या प्रकल्पांना उद्योग निरीक्षक भेट देत आहेत.












## विश्वकर्मा कृषि अवजारे समूह प्रकल्पाला भेट, साडवली एमआयडीसी, देवरुख दि १४.०१.२०२५





## प्रिंटिंग प्रेस प्रकल्पाला भेट, मिरजोळे एमआयडीसी, रत्नागिरी दि ०५.०२.२०२५





# मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम या योजनेच्या प्रचार व प्रसिद्धी साठी, १०० दिवसांत मेळाव्यांचे आयोजन












# ७. आर्थिक व औद्योगीक गुंतवणुकीस प्रोत्साहन

१.उद्योग संचालनालय, जिल्हा उद्योग केंद्र यांच्या सर्व योजनांची माहिती एकाच ठिकाणी उपलब्ध व्हावी यासाठी ती पुस्तकरूपात प्रसिद्ध करण्यात आली आहे.

२. गुंतवणूकदार उद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी उद्योग संचालनालयाने मैत्री २.० या पोर्टलचे अनावरण केले आहे. या पोर्टलची लिंक रत्नागिरी जिल्ह्याच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आली आहे. तसेच रत्नागिरी जिल्ह्याचे ODOP - हापूस आंबा व मासे यासंबंधित माहिती जलद दुवे या शीर्षकाखाली उपलब्ध करून देण्यात आली आहे.



४. रत्नागिरी जिल्ह्यामध्ये 7 मार्च 2024 रोजी 61  उद्योग घटकांशी 1403 कोटींचे, सामंजस्य करार (MoU) करण्यात  आले होते. त्या उद्योग घटकांशी संपर्क करून विविध टप्प्यांवर त्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

५. रत्नागिरी जिल्हयामध्ये जिल्हा उदयोग केंद्रातर्फे महाराष्ट्र राज्य औदयोगिक समूह विकास योजनेत (MSI-CDP)  अंतर्गत गारमेंट क्लस्टर, चिपळूण,  फूड ॲन फ्रुट प्रोसेसिंग क्लस्टर, चिपळूण व फिश क्लस्टर, हर्णे येथे स्थापित करण्यात येणार आहे. या सामायिक सुविधा केंद्रांना MIDC मध्ये जागा मिळवून देणे व इतर अनुषंगिक परवाने काढणेकामी जिल्हा उद्योग केंद्राने सहकार्य केले आहे.

६. गुंतवणूकदार उदयोजकांच्या तसेच निर्यातदारांच्या अडचणींचे निराकरण करण्यासाठी जिल्हा उद्योग मित्र समिती (ZUM)  व जिल्हा निर्यात प्रचालन समितीच्या (DEPC) बैठका आयोजित केल्या जातात.

# ८.(अ) (इ) गुंतवणूकदार उद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी पोषक वातावरण तयार करणे

## रत्नागिरी जिल्हास्तरीय गुंतवणूक परिषद

- गुंतवणूकीस प्रोत्साहन देण्यासाठी रत्नागिरी जिल्हास्तरीय गुंतवणूक परिषद ०९ एप्रिल २०२५ रोजी, रत्नागिरी येथे पार पडली.
- या गुंतवणूक परिषदेत एकूण ५७ उदयोग घटकांशी १०३७ कोटींचे सामंजस्य करार (MoU) करण्यात आले. यातून ११२७ एवढी रोजगारनिर्मिती होणार आहे. यात रसायने, फार्मास्यूटीकल, क्रशर इ. उदयोग घटकांचा समावेश आहे.
- जिल्हास्तरीय गुंतवणूक परिषदे चा उद्देश रत्नागिरी जिल्ह्यात पोषक औदयोगिक वातावरणाची निर्मिती करणे, गुंतवणूकदारांना प्रोत्साहन देणे तसेच त्यांच्या अडचणींचे निराकरण करणे हा आहे.







### गुंतवणूक परिषदेत १०३७ कोटींची गुंतवणूक

#### मंत्री उदय सामंत : रत्नागिरी बनतेय उद्योजकांसाठी 'हब'

रत्नागिरी, ता. ९ : जिल्हास्तरीय गुंतवणूक परिषदेच्या माध्यमातून जिल्ह्यातील उद्योजकांमार्फत जिल्ह्यात १ हजार ३७ कोटींची गुंतवणूक होणार आहे. रत्नागिरी उद्योजकांसाठी हब बनत चालली आहे. पर्यावरणपूरक उद्योग प्रकल्प तसेच पर्यटन प्रकल्पासाठी महिलांनी आता पुढे आले पाहिजे, असे आवाहन उद्योगमंत्री उदय सामंत यांनी केले.

येथील स्वयंवर मंगल कार्यालयात जिल्हास्तरीय गुंतवणूक परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी मंत्री सामंत म्हणाले, स्थानिक उद्योजकांच्या माध्यमातून एक हजार ३७ कोटींचे सामंजस्य करार आज झाले. यात प्रामुख्याने लोटे परशुराम येथे सुप्रिया केमिकल्स ५५० कोटी गुंतवणूक करणार आहे. 'एमएसएमई'च्या माध्यमातून ५०० कोटी गुंतवणुकीचा समावेश आहे. मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमात ११५ टक्के उद्दिष्ट पूर्ण करत जिल्हा प्रथम क्रमांकावर राहिला आहे. अनुदान देण्याचे प्रमाण ९८ टक्के आहे. मागच्या वर्षी एक हजार कोटींचे विस्तारीकरण झाले त्यातील ७०० कोटींची अंमलबजावणी झाली असून, ३०० कोटींची वर्षभरात अंमलबजावणी पूर्ण होणार आहे. परकीय गुंतवणुकीसाठी दावोसला तीन वेळा गेलो. रेड कार्पेट ही संकल्पना पुढे आणली. ९६ हजार कोटींची राज्यात गुंतवणूक झाली.

पान ७ वर >>

रत्नागिरी : जिल्हास्तरीय गुंतवणूक परिषदेच्या माध्यमातून उद्योजकांशी अनेक सामंजस्य करार करताना उद्योगमंत्री उदय सामंत.

**आणखी १० टुरिस्ट गाड्या**

महिला बचत गटांनी टुरिझमसाठी पुढे यावे, स्वयंपूर्ण व्हावे या भावनेतून त्यांना चार टुरिस्ट वाहने दिली आहेत. १० वाहने आणखी देणार असल्याचे सांगून उद्योगमंत्री डॉ. सामंत म्हणाले, 'हाऊसबोट प्रकल्पामध्येही महिलांनी सहभागी व्हावे. स्थानिक रोजगार निर्मितीसाठी चांगल्या पर्यावरणपूरक उद्योग प्रकल्पांसाठी महिलांनी पुढे यावे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण ही योजना अजिबात बंद होणार नाही.'



# ८.(आ) व्यापारी/कामगार वर्गाच्या संघटनांशी चर्चा करून त्यांच्या अडचणी सोडविणे

## रत्नागिरी जिल्हास्तरीय निर्यात परिषद

- जिल्हा उद्योग केंद्र, रत्नागिरी मार्फत निर्यात क्षेत्रास प्रोत्साहन देण्यासाठी, रोजगार निर्मितीचे लक्ष्य साध्य, करण्यासाठी दि. ०३ जानेवारी २०२५ रोजी अल्पबचत भवन, रत्नागिरी येथे जिल्हास्तरीय निर्यात परिषद आयोजित करण्यात आली.
- निर्यातीत रत्नागिरी जिल्ह्याचे योगदान हे ६ हजार कोटींचे आहे.
- या कार्यक्रमास सीमा शुल्क विभाग, DGFT, MPEDA, इंडिया पोस्ट, बँक ऑफ बडोदा व मस्त्य विभागाचे अधिकारी उपस्थित होते.
- शासनाकडून राबवण्यात येणाऱ्या योजनांचा व सुविधांचा लाभ निर्यातदारांनी व्हावा असे आवाहन करण्यात आले
- जिल्हास्तरीय निर्यात परिषद, रत्नागिरी या कार्यक्रमामुळे तांदूळ निर्यातदार उद्योजक यांना इंडिया पोस्टच्या डाक निर्यात केंद्र या योजनेची माहिती झाली. या योजनेचा लाभ घेवून ते वाडाकोलम तांदूळाची निर्यात अमेरिका येथे करणार आहेत.





वृत्तपत्राचे नाव :- दै.सकाळ स्थळ :- रत्नागिरी दिनांक :-०५/०१/२०२५

निर्यातीमध्ये रत्नागिरीचे ६ हजार कोटींचे योगदान

विजू शिरसाठ : रत्नागिरीत निर्यात प्रचालन कार्यशाळा

# ९.अधिकारी कर्मचारी प्रशिक्षण, सेवा विषयक बाबी आणि कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा वापर (AI)

- कार्यालयातील कर्मचारी यांना कृत्रिम बुद्धिमत्ता संदर्भात प्रशिक्षण देण्यात आले आहे. व संदर्भ साहित्य पुरवण्यात आले आहे.
- कार्यालयातील कर्मचारी यांना विभागीय कार्यालय ठाणे यांच्याकडून आस्थापना शाखा, लेखा शाखा व कार्यालयीन कामकाजा करिता कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर या विषयी प्रशिक्षण देण्यात आले आहे.
- कार्यालयातील कर्मचाऱ्यांचा तक्रारांच्या निवारण करण्यासाठी दर महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या सोमवारी महाव्यवस्थापक यांच्या दालनात बैठकीचे आयोजन करण्यात येते. कार्यालयातील महिलांच्या तक्रारींची निवारण करण्यासाठी कामाच्या ठिकाणी महिलांचा लैगिक छळ (प्रतिबंध, मनाई आणि निवारण) कायदा २०१३ अन्वये अंतर्गत तक्रार समिति स्थापन करण्यात आली आहे.





# १०. नावीन्यपूर्ण उपक्रम

## १.ODOP उपक्रम

- ODOP उपक्रमांतर्गत कार्यवाही : रत्नागिरी जिल्हयाचे हापूस आंबा व मासे हे 'एक जिल्हा - एक उत्पादन वस्तू आहेत. त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी विविध कार्यक्रमांत ODOP वस्तू भेट स्वरुपात देण्यात येतात.

- राष्ट्रीय स्तरावरील ODOP पुरस्कारांमध्ये, रत्नागिरी जिल्ह्याने 2024-25 या वर्षासाठी नामांकन दाखल केले होते. रत्नागिरी जिल्हा हा देशातील 60 जिल्हयामध्ये निवड होऊन पुढील स्तरावर भौतिक पडताळणीसाठी पात्र ठरला. श्री शेर्पा सर, DPIIT यांनी रत्नागिरीत येऊन 'हापूस आंबा' या उत्पादनासाठी भौतिक पडताळणी केली.

# ओडिओपी (ODOP) हापूस आंबा भौतिक पडताळणी दरम्यानची छायाचित्रे








वृत्तपत्राचे नाव :- दै.तरुण भारत     स्थळ :- रत्नागिरी

## वन डिस्ट्रीक्ट वन प्रॉडक्ट' नामांकनात 'रत्नागिरी'

**केंद्रीय वाणिज्य, उद्योग मंत्रालयस्तरावर पडताळणी; हापूस आंबा उत्पादनात देशात रत्नागिरी बनला 'एक ब्रॅण्ड'**

प्रतिनिधी
रत्नागिरी

द्र शासनाच्या 'वन डिस्ट्रीक्ट वन प्रॉडक्ट अॅवॉर्ड ०२३-२४'साठी देशातील ६० जिल्ह्यांच्या नामांकनामध्ये व ज्यातील १४ जिल्ह्यात रत्नागिरीचा समावेश झाला आहे. द्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाच्या इन्व्हेस्ट इंडियाचे हायक व्यवस्थापक ताशी दोरजे शेर्पा यांनी गुरुवारी या बत बैठक घेतली. पडताळणीही केली. जिल्ह्याने केलेल्या मगिरीबद्दल रत्नागिरी जिल्हा हापूस आंबा उत्पादनात ात एक ब्रँड झाला आहे, असे गौरवोद्गार त्यांनी काढले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात जिल्हाधिकारी एम. वेंदर सिंह यांनी संगणकीय सादरीकरण करुन सविस्तर हिती दिली. आंब्यावरोबरच काजू, नारळ, कोकम आणि से ही जिल्ह्याची उत्पादने आहेत. २०१८ साली हापूस ंब्याला जीआय टॅग मिळाला आहे. राज्यामध्ये १६२.०८ ार हेक्टर क्षेत्रामध्ये आंबा क्षेत्र आहे. त्यातून ४६३.१७ ार टन आंबा उत्पादन होते. हेच प्रमाण कोकण विभागात २६.४१ हजार हेक्टर लागवड क्षेत्रामध्ये २१३.३७ हजार टन ंबा उत्पादन होते. तर एकट्या रत्नागिरी जिल्ह्यामध्ये ७.७९ हजार हेक्टर क्षेत्रामध्ये आंब्याची लागवड आहे. ातून १२३.०६ हजार टन आंबा उत्पादन होतो. ०२२-२३ ला कोकण विभागात रत्नागिरी जिल्ह्यामध्ये र्वाधिक ६७ हजार ७९६ हेक्टर क्षेत्रामध्ये आंब्याची लागवड रण्यात आली आहे. त्यामधून १ लाख २३ हजार ६८ मे. टन आंबा उत्पादन घेवून रत्नागिरी प्रथम क्रमांकावर राहिला आहे.




रत्नागिरीः येथील जिल्हाधिकारी कार्यालय सभागृहात आयोजित बैठकीवेळी केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाच्या इन्व्हेस्ट इंडियाचे सहाय्यक व्यवस्थापक ताशी दोरजे शेर्पा, जिल्हाधिकारी एम. देवेंदर सिंह आदी अधिकारी.

२०२२-२३ आणि २०२३-२४ वर्षासाठी रत्नागिरी जिल्ह्यामधून आंबा निर्यात करुन अनुक्रमे १४५.९८ लाख व २५०.८६ लाख इतके उत्पन्न मिळाले आहे. हापूस आंब्याची सर्वाधिक आयात करणारे देश कुवेत, संयुक्त अरब अमिराती, युनायटेड किंग्डम, कतार, ओमान, युनायटेड स्टेटस ऑफ अमेरिका, बहरिन आणि कॅनडा आहेत. तत्कालीन पालकमंत्री आणि उद्योगमंत्री उदय सामंत यांनी या बाबत नेहमीच बैठका घेवून मार्गदर्शन केले आहे, असेही जिल्हाधिकारी म्हणाले.

केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाच्या इन्व्हेस्ट इंडियाचे सहायक व्यवस्थापक शेर्पा यांनी समाधान व्यक्त केले. ते म्हणाले, देशातील ६० जिल्हा व राज्यातील १४ जिल्ह्यांमध्ये रत्नागिरी जिल्ह्याचा समावेश आहे. क्यू आर कोड, मोबाईल कुलिंग युनिट यासारखी चांगली कामगिरी आणि खूप चांगले काम तुम्ही सर्वांनी केले आहे. हापूस आंब्यासंदर्भात रत्नागिरी हा एक देशात ब्रँड झाला आहे. जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक प्रकाश हणबर यांनी स्वागत करुन सर्वांचे आभार मानले. बैठकीला एमएसएमईचे मिलिंद जोशी, डीआयसीचे व्यवस्थापक संकेत कदम, डॉ. विवेक मिडे, माविमचे जिल्हा समन्वयक अंबरीश मिस्त्री, हापूस आंबा उत्पादक संघाचे मुकुंदराव जोशी उपस्थित होते. त.भा

# २. ONDC या e-commerce संकेतस्थळावर उद्योजक नोंदणी

- श्री. अमर देसाई आंबा उत्पादक व निर्यातदार यांची ONDC या e-commerce संकेतस्थळावर नोंदणी करण्यात आली आहे.



# धन्यवाद !